# कृषी विद्यापीठ धुळ्यालाच होण्यासाठी आग्रह
# २१ जानेवारीला महाविद्यालये बंद ठेवण्याची हाक
# विद्यापीठ निर्मीती कृती समितीच्या बैठकीत निर्णय

**धुळे** : ता.–१० – राहुरी जि.अहमदनगर येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या विभाजनानंतर निर्माण होणारे नवे स्वतंत्र कृषी विद्यापीठ धुळ्यालाच झाले पाहिजे, त्यासाठी पोषक स्थिती असून या निर्णयामुळे जिल्हा विकासाला चालना मिळू शकेल. या संदर्भात प्रथम १५ ते १८ जानेवारीपर्यंत जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाच्या आवारात जनजागृती आणि जिल्ह्यातील गुरुवार दि. २१ जानेवारीला वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालये बंद आंदोलन पुकारले जाणार आहे. असा निर्णय कृती समितीच्या बैठकीत एकमताने घेण्यात आला.

धुळे येथील गुलमोहर विश्रामगृहात सर्वपक्षीय व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची झालेल्या कृती समितीच्या बैठकीत निर्णय झाल्याची माहिती समितीचे निमंत्रक माजी आमदार प्रा.शरद पाटील यांनी दिली. याबैठकीस श्री.साहेबराव देसाई, अतुल सानेवणे, भुपेंद्र लहामगे, सुधीर जाधव, लहू पाटील, शाम बडगुजर,प्रा.विजयसिंह सिसोदीया, डी.झेड मोरे, संजय गिरासे, अभियंता श्री.मडाले, कैलास पाटील, मनिष जोशी, धीरज पाटील, युवासेनेचे पंकज गोरे, कमलेश भामरे, प्रदीप पाटील, प्रा.रविंद्र पाटील, शंकरररराव खरात, प्रा.एस.एन.पाटील यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

धुळे शहर तीन राष्ट्रीय महामार्गालगत वसले आहे. येथे पूर्वीपासूनच कृषी महाविद्यालय आहे. तेथे पुरेसे पाणी, मनुष्यबळ, जमीनीची उपलब्धता आहे, कृषीविषयक संशेधनासाठी या जिल्ह्यात भरपूर वाव आहे. त्यामुळे राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या विभाजनानंतर स्वतंत्र होणारे विद्यापीठ धुळे शहरातच झाले पाहिजे, अशी एकमुखी भूमीका बैठकीत मांडली गेली. त्यानुसार १५, १६ आणि १८ जानेवारीला कॉर्नर बैठका, महाविद्यालयांमध्ये विद्यापीठाच्या मागणीविषयी जनजागृती केली जाईल. व या आंदोलनासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविला जाईल.

नंतर जिल्हाभरात गुरुवार दि.२१ जानेवारीला महाविद्यालये बंद चे आवाहन केले जाईल. तसेच या आंदोलनानंतर पुढील नियोजनानुसार मा.कृषीमंत्री, मा.मुख्यमंत्री व मा.राज्यपाल महोदयांच्या भेटीसाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींसह शिष्टमंडळ निवेदनासह भेट घेईन असे प्रा.पाटील यांनी या बैठकीत सांगितले.

काल दि.९ रोजी पिंपळनेर व साक्री येथे शिक्षण संस्था चालकांची भेट घेऊन दि.२१ रोजी आंदोलनाला पाठींबा म्हणून साक्री तालुक्यातील महाविद्यालये बंद ठेवून मा.तहसिलदार साक्री यांना निवेदन देण्यात येणार आहे. काल कृती समितीचे निमंत्रक प्रा.शरद पाटील यांनी साक्री व पिंपळनेर येथे या संदर्भात बैठक घेतली. जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी संघटनांनी देखिल २१ तारखेच्या महाविद्यालय बंद आंदोलनात सहभागी व्हावे अशी विनंती कृती समितीने केली आहे.

**प्रा.शरद पाटील यांचे स्विय सहाय्यक**

Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.